“कृषी क्षेत्राच्या विकासात शासकीय कृषी विकास योजनांचे योगदान

विशेष संदर्भ : हिंगोली जिल्हा”

(2009-10 ते 2019-20)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा पूर्व संशोधन आराखडा

● संशोधक ●

व्ही. बी. कदम

एम.ए., बी.एड., सेट.(अर्थशास्त्र)

● मार्गदर्शक ●

प्रा. डॉ. डी. डी. भोसले

सहाय्यक प्राध्यापक

यशवंत महाविद्यालय, नांदेड

◦ संशोधन केंद्र ◦

यशवंत महाविद्यालय, नांदेड

24 मार्च 2022

“कृषी क्षेत्राच्या विकासात शासकीय कृषी विकास योजनांचे योगदान विशेष संदर्भ: हिंगोली जिल्हा”

प्रस्तावना (Introduction) :-

प्राचीन काळापासून मानवी जीवनातील एक अविभाज्य भाग म्हणजे शेती व्यवसाय होय. हा शेती व्यवसाय मानवाच्या उदरनिर्वाहाचे फक्त एक साधन नसून संस्कृतीक वारसा बनला आहे. भारतासारख्या कृषीप्रधान राष्ट्रात तर कृषी विषयक संस्कृतीक वारसा आज तागायत सुद्धा आपल अस्तित्व टिकवून आहे. भारतातील बहुसंख्य सन-उत्सव, प्रथा आणि परंपरा शेती व सलग्नीत व्यवसायाशी निगडीत आहेत. मानवजातीच्या विकासामध्ये शेती व सलग्नीत क्षेत्राचा मोलाचा वाटा आहे. अगदी त्याच प्रमाणे प्रत्येक राष्ट्राच्या आर्थिक विकासात सुद्धा शेती व सलग्नीत क्षेत्राचे योगदान महत्वाचे आहे. मानवाला जीवनातील दैनंदिन गरजा भागवण्यासाठी आवश्यक असणा-या डाळी, अन्नधान्य, भाजीपाला, फळे इत्यादी उपयोगी वस्तू पुरवण्याची जबाबदारी शेती क्षेत्रामार्फत समर्थपणे सांभाळली जाते. इतकेच नव्हे तर बहुतांश उघोगधंद्यांना लागणारा कच्चा मालही शेतीतूनच पुरवला जातो. म्हणजेच एका बाजूला जीवन अवश्यक गरजांची पूर्तता करणे व दुस-या बाजूला देशाच्या औघोगिकीकरणात सहाय्य करणे आशी दुहेरी भूमिका शेती क्षेत्र वटवते. एकंदरीत रोजगार निर्मितीचे साधन, राष्ट्रीय उत्पन्नातील मोठा हिस्सा, निर्यातीतील कामगिरी, औघोगिकीकरणात सहाय्य इत्यादी विविध दृष्टीकोनातून शेती क्षेत्र महत्वाचे ठरले आहे.

भारतासारख्या लोकसंख्या बहूल राष्ट्राला स्वावलंबनाची शिकवन देणारे कृषी क्षेत्र आजही देशाच्या आर्थिक विकासात मोलाचा वाटा उचलत आहे. आजही भारतातील 55 ते 58 टक्के लोकसमुदायास रोजगार उपलब्ध करुन देणारे कृषी हे एकमेव क्षेत्र आहे. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर उद्भवलेल्या बिकट परिस्थितीत देशाला उपासमारीतून बाहेर काढण्याचे महत्वाचे कार्य ज्यांनी केले असे हरित क्रांतीचे जनक **डॉ. एम. एस. स्वामीनाथन** म्हणतात की,

“कृषी क्षेत्राच्या विकासा शिवाय कोणत्याही देशाचा आर्थिक विकास करणे अशक्य आहे. देशाला विकसनशीलतेच्या वाटेवर प्रवास करुन विकसीत व्हायचे असेल तर प्रथम कृषी क्षेत्राचा विकास करणे क्रमप्राप्त आहे.”

आज विकसीत अर्थव्यवस्थांचा इतिहास अभ्यासला असता हे स्पष्ट दिसते की, जगातील अमेरीका, जापान, इंग्लड, जर्मनी, रुस या सारखे महासत्ता झालेले राष्ट्र सर्वप्रथम कृषी क्षेत्रात विकसीत झाले नंतरच त्यांचा औघोगिक विकास होऊन ते महासत्ता म्हणून नावारुपास आले. परंतु आर्थिक विकासात कृषी क्षेत्राची भुमीका कितपत महत्वाची आहे याबद्दल अर्थतज्ज्ञामध्ये मतमतांतरे आढळून येतात. उदाहरणार्थ **बार्कर** आणि **विल्सन** यांच्या मते,

“शेती हे अर्थव्यवस्थेचे पायाभूत क्षेत्र आहे. कारण मानवाची अन्नविषयक मूलभुत गरज व उघौग क्षेत्राला लागणारा कच्चा माल याच क्षेत्रातुन मिळत असतो. त्यामुळे कोणत्याही क्षेत्राच्या आर्थिक विकासात प्राथमिक भुमिका कृषी क्षेत्राचीच आहे.”

याउलट काही तज्ज्ञांच्या मते, ‘अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबर शेतीचे महत्व कमी होत जाते. त्यामुळे त्यास मूलभुत क्षेत्र म्हणता येणार नाही.’ तर काही तज्ज्ञांनी मात्र याबाबत मध्यमार्गी भूमिका मांडली आहे. त्यांच्या मते, ‘अर्थव्यवस्थेची सर्वच क्षेत्रे ही एकंमेकांना पूरक असतात, प्रत्येकच क्षेत्राचा विकास हा एकमेकांवर अवलंबून आसतो.’ उदा. उघोग क्षेत्राला आवश्यक असणारा कच्चा माल कृषी क्षेत्रातून पुरवला जातो आणि कृषीला लागणारी अवजारे उघोग क्षेत्रातून पुरवली जातात.

कृषी प्रधान असलेल्या भारतातील कृषी क्षेत्र स्वातंत्र्य पूर्व कालखंडात व स्वातंत्र्योत्तर कालखंडात अविकसीत राहीले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय शेतीची प्रतीहेक्टरी व प्रतीश्रमीक उत्पादकता अत्यंत कमी राहीलेली आहे. शेती क्षेत्रात परंपरागत जुने व मागासलेले तंत्रज्ञान वापरले जात असे. शेतीच्या अल्प उत्पादकतेमुळे शेतक-यांचे उत्पादन सुद्धा अल्प राहीले. केवळ चरितार्थ भागविता येइल इतकेच उत्पन्न शेतक-यांना मिळत असे. या काळात शेतीविषयक व्यापारी दृष्टीकोनास फार महत्व नव्हते हे स्पष्ट होते. स्वातंत्र्योत्तर काळातही सुरुवातीच्या काही वर्षात भारतीय शेती मागासलेली व गुणात्मकदृष्ट्या पारंपारिक स्वरुपाची होती. परंतू पारतंत्र्यामुळे निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीत देशाला अन्न धान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनवण्या साठी तत्कालीन सरकारने नियोजनबद्ध कार्यक्रम हाती घेउन पंचवार्षीक योजनांच्या माध्यमातून शेती विकासाचे अनेक कार्यक्रम राबविले. जमीन सुधारणा कार्यक्रम, पत पुरवठ्याच्या सुविधा, वाहतूक व दळणवळण सोयी, पाणीपुरवठा सोयी व जलसिंचनाच्या सुविधा, विक्रीव्यवस्थेत सुधारणा इत्यादी कारणामुळे शेती विकासाला बरीच मदत झाली. उदाहरणार्थ किसान क्रेडिट कार्ड योजना (1998-99), पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना (1990), राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (2008), जलयुक्त शिवार अभियान (2014), मागेल त्याला शेततळे योजना (2015), नानाजी देशमुख कृषी संजीवणी प्रकल्प (2018-19), सहकार मित्र योजना (13 जून 2020), महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना (2019), प्रधानमंत्री किसान मानधन योजना (12 सप्टेबर 2019), अटल सौर कृषी पंप योजना, राष्ट्रीय कामधेनु योजना (2019-20), प्रधान मंत्री किसान सन्मान निधी योजना (01 फ्रेब्रुवारी 2019), इ-नाम योजना (14 एप्रिल 2016) इत्यादी योजनांमधून शेती क्षेत्रासाठी आवश्यक आदाने उदा. बी-बीयाने, खते, औषधे, कृषी अवजारे इत्यादी, त्याबरोबरच शेतीत गुंतवणूक करण्यासाठी कृषी कर्ज यांची उपलब्धता करुन दिली. इ. सन. 1967-68 मध्ये हरितक्रांतीची सुरुवात करुन देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी करण्याचा प्रयत्न सरकारने केला. तथापि सर्वसामान्य शेतक-यापर्यंत हरितक्रांतीचे व इतर योजनांचे लाभ पोहचू शकले नाहीत. तसेच गहू, तांदूळ, मका, बाजरी, यांसारखी पिके वगळता इतर पिकांच्या उत्पादनात लक्षणीय प्रगती झाली नाही, सिंचन सोयींचा पुरेसा विस्तार झालेला नसल्याने आजही बहुतांशी शेती मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. 1991 पूर्वी कृषी क्षेत्राचा 3.39 असणारा प्रतिवार्षिक वृद्धी दर नंतर मात्र घटून 2.77 झाला. सामान्यपणे जमीनीची मालकी, शेतजमीनीचा आकार, शेतीत वापरले जाणारे तंत्रज्ञान, जलसिंचनाच्या अपु-या सोयी, ग्रामीण कर्जबाजारीपणा, ग्रामीण अर्थव्यवस्थेतील

सावकाराची वैशिष्ट्यपूर्ण भूमिका यासारख्या अनेक कारणांमुळे भारतीय शेतीचे स्वरूप आजही मागासलेले राहीले आहे.

20 व्या शतकाच्या उत्तरार्धात जगाबरोबर भारताने सुद्धा औद्योगिक विकासाकडे वाटचाल करायला सुरुवात केली. जगामध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक बदल होत गेले. भूगोल, खगोलशास्त्र, रसायनशास्त्र, अभियांत्रिकीचा विकास होत गेला. त्यामुळे सर्वच देशात औद्योगिक विकासाचे वारे वाहू लागले. मानवाच्या भौतिक जगण्यातील स्थिरता जाऊन तो अधिक गतिमान झाला. पूर्वी शेती हाच कणा असलेली देशाची अर्थव्यवस्था आता मात्र शेती, उघोग आणि सेवा क्षेत्राच्या पायावर उभी राहिली. परंतु या आधुनिकतेच्या कालखंडात सोबतच निर्माण होणाऱ्या अपातकालीन परिस्थितीत राष्ट्राचा आर्थिक विकास घडवून आणायचा असेल, उपलब्ध संसाधनाचा कार्यक्षम व शाश्वत वापर करायचा असेल, उदारिकृत अर्थव्यवस्थेचा आणि जागतिक व्यापाराचा फायदा करून घेण्यासाठी, निर्यातीस चालना देण्यासाठी आणि कृषी उत्पादन अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान प्राप्त करण्यासाठी देशाला शाश्वत शेतीकडेच वळावे लागेल आणि शाश्वत शेतीच आज मानवजातीच्या जीवन पद्धतीने योग्य वाटत आहे. शाश्वत शेतीकडे वाटचाल करण्यासाठी आणि गहन शेतीचा परिचय करून देण्यासाठी कृषी विषयक आदाने, उत्पादन, वितरण, विपणन, नियोजन आणि जैविक तंत्रज्ञान या सगळ्या घटकांवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

आज घडीला भारतातील सुमारे 58.2 टक्के लोकसंख्येचा जगण्याचा सर्वात मोठा आणि प्राथमिक स्त्रोत शेती हा आहे. पंधरा कृषी-हवामान झोन असलेल्या भारताला मुबलक प्रमाणात शेती योग्य जमीन निसर्गाकडून उपलब्ध झालेली आहे. त्यात जवळपास सर्वच मातीचे प्रकार आणि विविध पिके घेण्यास उपयुक्त हवामान असल्याने गहू, तांदूळ, तेलबिया, फळे आणि भाज्या उत्पादित करणारा भारत हा जगात दुसऱ्या क्रमांकाचा तर दुध, मसाले, डाळी, चहा, काजू आणि जूट यांचा अव्वल क्रमांकाचा उत्पादक देश आहे. भारतातील सर्वात जास्त कृषी उत्पादन करणा-या राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक राज्य आहे. राज्यातील सन 2011 च्या एकूण लोकसंख्येच्या 50 टक्के लोकसंख्या शेती व संलग्नीत व्यवसायावर अवलंबून आहे. सन. 1960-61 मध्ये राज्याचे एकूण उत्पन्न 2,250 कोटी होते, त्यात कृषी, उघोग आणि सेवा क्षेत्राचा वाटा अनुक्रमे 26, 24 आणि 50 टक्के होता. राज्याच्या विकासाबरोबरच कृषी क्षेत्राचा वाटा घटून 2019-20 मध्ये 10 टक्के झाला. अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबरच राष्ट्रीय उत्पन्नातील कृषीचा घटत जाणारा वाटा हे एक संरचनात्मक बदलाचे घोतक समजले जाते. परंतू राज्य उत्पन्नातील कृषीच्या घटत्या वाट्या बरोबर कृषी वर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण मात्र घटले नाही. त्यामुळे राज्यातील 50 टक्के लोकसंख्या केवळ 10 टक्के उत्पन्नावर आपला निर्वाह भागवते, म्हणजे राज्यातील कृषी क्षेत्र अजही अविकसित आणि गरीब आहे. या सगळ्या घडामोडी मुळे राज्यातील कृषी विकासाचा प्रश्न अजूनतरी अनुत्तरित राहीलेला आहे. भारतीय विचारवंत **शरद जोशी** या संदर्भात म्हणतात की,

"भारतीय शेतकरी हा कर्जात जगतो व कर्जातच मरतो."

या निमित्ताने त्यांचे हे विधान सत्यच असल्याचा भास होतो.

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आज जगातील प्रत्येक देशच विविध कृषी विषयक योजनांच्या माध्यमातून कृषी अंशदानाचे वाटप करत आहेत. कृषी अंशदानाचा हा विषय राजकीयदृष्ट्या फार संवेदनशील आहे. कृषी क्षेत्राला अंशदाने देण्याविषयी काही तज्ज्ञांनी जोरदार समर्थन केले आहे तर काही तज्ज्ञांनी याला तीव्र विरोध दर्शवलेला आहे. जगातील वेगवेगळ्या देशांनी दिलेल्या कृषी अंशदानाचा आढावा आपणास पुढील प्रमाणे घेता येईल.

तक्ता क्र. 01

वेगवेगळ्या देशातील कृषी अंशदाने

[आकडे अमेरिकन दशलक्ष डॉलर मध्ये]

अ.क्र.	**देश**	**2019**	**2020**
01	अर्जेंटिना	10402	6700
02	ऑस्ट्रोलिया	2190	2140
03	न्रॉर्वे	2964	2505
04	स्वित्झर्लंड	5999	6779
05	कोरिया	21130	21731
06	जपान	42647	43483
07	फिलीपिन्स	7734	8214
08	इंडोनेशिया	25198	23052
09	युरोपीयन युनियन	104612	103067
10	तुर्की	8270	9660
11	रशिया	8691	6359
12	चीन	191077	205705
13	भारत	8560	33800
14	संयुक्त राष्ट्र	51718	40787

स्त्रोत : https://www.oecd-ilibrary.org/agriculture-and-food/agricultural support/indicator/english_6ea85c58-en

तक्त्यातील माहितीचे पुढील आलेखाद्वारे विश्लेषणव करण्यात आले आहे.

आलेख क्र. 01



वरील तक्ता आणि आलेख क्र.01 मध्ये जगातील वेगवेगळया देशांनी दिलेल्या कृषी अनुदाणाची माहिती दर्शवण्यात आली आहे. या वरून असे स्पष्ट होते की, आज जगातील प्रत्येकच देश कृषी क्षेत्र विकासासाठी मोठ्या प्रमाणात कृषी अंशदाने देत आहेत. प्रत्येक देशाचा अंशदानावरील खर्च त्या देशाच्या एकून कृषी प्राप्तीच्या जवळपास 10 ते 54 प्रतिशत आहे. एकून देय कृषी अंशदानाच्या बाबतीत चीन, युरोपियन युनियन आणि युनायटेड स्टेट्स पहील्या तीनमध्ये समाविष्ट आहेत. एकून कृषी प्राप्तीच्या तुलनेत कृषी अंशदानाचा विचार करता नॉरवे, स्विट्झर्ल्यान्ड आणि कोरिया हे देश अनुक्रमे 57.6, 47.4 आणि 46.1 प्रतिशत येवढ्या मोठ्या प्रमाणावर कृषी अंशदाने देतात. परंतू याच देशाच्या एकून देय कृषी अनुदानाचा विचार करता ते इतर देशाच्या तुलनेत अल्प आसल्याचे दिसते. तर दुसरीकडे कोरिया, रशिया, फिलीपिन्स आणि तुर्की हे देश आपल्या एकून कृषी प्राप्तीच्या सरासरी 6.5 प्रतिशत येवढे अल्प आणि एकून देय अनुदान इतर देशाच्या तुलनेत कमी देतात. चीन या देशाचे अनुदान कृषी प्राप्तीच्या तुलनेत कमी असले तरी एकून देय अनुदानाच्या बाबतीत ते इतर देशाच्या तुलनेत खुप जास्त आहे. युरोपिय युनियन आणि संयुक्त राष्ट्र यांच्या एकूण देय अनुदाना येवठे अनुदान एकटा चीन देतो. तर दुसरी कडे तुर्की, रशीया, इस्त्रायल, नॉर्वे आणि ऑस्ट्रेलिया हे देश मात्र इतर देशाच्या तुलनेत अल्प कृषी अनुदाने देतात.

तक्ता क्र. 02

विविध कृषि विकास योजना अंतर्गत भारत सरकार कडून देण्यात आलेले अनुदान

(अनुदान आकडे कोटी रुपये मध्ये)

अ.क्र.	वर्ष	खते	वीज	जलसिंचन	इतर	एकून
01	1999-00	13344	6033	11196	3118	33591
02	2000-01	13800	8919	13259	2633	38711
03	2001-02	12595	10410	13009	3234	39248
04	2002-03	11015	8521	12794	3173	35503
05	2003-04	11847	14544	10921	4132	41444
06	2004-05	15879	17977	12290	3640	49786
07	2005-06	18460	19431	14280	3647	57818
08	2006-07	26222	19729	16978	4764	67693
09	2007-08	32490	20661	19457	15100	87708
10	2008-09	76603	27489	23665	33160	160917
11	2019-20	-	-	-	-	277000

स्त्रोत : रायखेलकर ; भारतीय अर्थव्यवस्था, विघा बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, पे. न .373

तक्त्यातील माहितीचे पुढील आलेखाद्वारे विश्लेषण केले आहे.

आलेख क्र. 02



वरील तक्ता आणी आलेख क्र. 02 मध्ये भारत सरकार कडून देण्यात येणाऱ्या कृषी विषयक अंशदानाचे विश्लेषण केले आहे. तक्त्यातील आकडेवारीचा अभ्यास करता हे सहज लक्षात येते की भारत सरकार कडून देण्यात येणाऱ्या कृषी अंशदानात भरपूर वाढ झाली आहे. भारत सरकार कडून शेतकऱ्यांना अल्प दरात खत उपलब्ध करून देण्याच्या धोरणामुळे खतांनवर अनुदान देण्यात येते. या रासायनिक खतांचा वापर दिवसेंन-दिवस वाढत असल्यामुळे खतांनवरील अनुदानात सातत्याने वाढ होत आहे. सन 1999-00 मध्ये खतांच्या सबसिडीवरील एकून खर्च 13,344 कोटी रुपये इतका होता. सन 2008-09 मध्ये त्यात प्रचंड वाढ होऊन तो 76,603 कोटी रुपये झाला. खता बरोबरच वीज, जलसिंचन यावर होणारा खर्च वाढला आहे. सन 1900 मध्ये वीज आणि जलसिंचनावर झालेला खर्च अनुक्रमे 6,033 आणि 11,196 कोटी रुपये होता, त्यात वाठ होऊन सन 2008-09 मध्ये अनुक्रमे 27,489 आणि 23,665 कोटी रुपये येवढा झाला. एकून अनुदानाचा विचार करता त्यात मोठी वाढ झालेली दिसते. सन 1999-00 मध्ये एकून कृषी अनुदान 33,591 कोटी असून त्यात वाढ होऊन सन 2019-20 मध्ये 2,77,000 कोटी रुपये एवढे झाले.

तक्ता क्र. 03

महाराष्ट्र राज्यातील कृषी अनुदान

अ.क्र.	वर्ष	अनुदान (कोटी रु)
01	2009-10	139.54
02	2010-11	151.27
03	2011-12	105.92
04	2012-13	324.83
05	2013-14	1562.54
06	2014-15	2470.30
07	2015-16	2120.02

स्रोत : Report on State Finances Maharashtra, Submitted 15th Finance Commission (P.N.-196)

आलेख क्र.03



वरील तक्ता आणि आलेख क्र.03 च्या सहाय्याने महाराष्ट्र राज्याचा कृषी अनुदानावर होणारा खर्च दर्शवण्यात आला आहे. कृषी व सहाय्यक क्षेत्राच्या विकासासाठी क्रेंद्र व राज्य सरकार मार्फत विविध योजना आमलात आणल्या जातात. यातील राज्य पुरस्क्रूत योजना राज्य सरकार कडून राबवल्या जात असल्या कारणाने त्यावर राज्य सरकारला खर्च करावा लागतो. सन 2009-10 मध्ये राज्याचा कृषी अनुदानावरील एकून खर्च 139.54 कोटी रुपये होता.त्यामध्ये प्रत्येक वर्षी सरासरी 330.08 कोटी रूपये येवढी प्रचंड वाढ होऊन सन 2015-16 मध्ये 2120.02 कोटी रुपये झाला. यातील सन 2012-13 या एकट्या वर्षात 1237.71 कोटी रूपये येवढी प्रचंड वाढ झाली आहे. याउलट 2015-16 मध्ये कृषी वरील एकून खर्चात मात्र मागील वर्षीच्या तुलनेत 350.28 कोटी रूपयाची घट झाल्याचे दिसून येते. एकंदर कृषी विकास योजनांन वर होणा-या खर्चात दिवसेंन दिवस वाढ होत आहे.

शासकीय कृषी विकास योजना संकल्पणा व अर्थ (Government Agriculture Development Plan Concept and Meaning) :-

बदलत्या आर्थिक-सामाजिक स्थितींत शेतक-यांना सक्षम करण्याच्या दृष्टीने आणि बाजाराशी सुसंगत धोरणे अंगीकारण्यासाठी सहाय्य करणे या दृष्टीने शासकीय कृषी विकास योजना ही संकल्पणा उदयास आली. कृषी विकास योजनांन द्वारे होणारा कृषी विकास ही सर्वसाधारण व सातत्यशील अशी प्रक्रिया आहे. ज्याद्वारे शेतक-यांना शेती पध्दतींची माहिती, ज्ञान आणि कौशल्य पोहचविण्यात येते. ग्रामीण भागात बहुसंख्येने असलेल्या शेतकरीवर्गाच्या आर्थिक उन्नतीसाठी कृषी विकास योजनांची अनन्य साधारण गरज अधोरेखित झाली आहे. शेती संबंधित तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत प्रभावी व परिणामकारकरित्या प्रसारित करणे आणि त्याचा

उत्पादकता वाढविण्यासाठी प्रत्यक्ष अवलंब करण्याच्या दृष्टिने शेतक-यांनी सक्षम निर्णय घ्यावा, यासाठी त्यांची क्षमताबांधणी करणे हा शासकीय कृषि विकास योजनांचा महत्वाचा उद्देश आहे.

ग्रामीण भागातील सध्याची आर्थिक स्थिती आणि अपेक्षित परिस्थिती यातील रुंदावत चाललेली दरी कमी करण्यासाठी आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या अंगीकारातून शेती व्यवसायात योग्य बदल घडून आणण्यासाठी शासकीय कृषि विकास योजनांची आवश्यकता आहे. कृषी विकास योजना ह्या प्रामुख्याने शेतक-यांना त्यांच्या गरजेनुसार कृषि उत्पादनाच्या वाढीसाठी सुधारित शेती तंत्रज्ञान, बि-बियाणे आणि सिंचन साधणे पुरवतात.

शासकीय कृषी विकास योजनांची व्याख्या (Definition of Government Agricultural Development Schemes):-

01) 'कार्य करण्याची रूपरेखा म्हणजे योजना होय'.

योजना ही सामान्यता: उद्देश साध्य करण्यासाठी वापरली जाणारी आकृती, तपशील किंवा वेळेनुसार करावयाची कामे आणि त्यासाठी लागणारी संसाधने यांची यादी असते. योजना संरचित असल्यास त्याचा उपयोग जास्त असू शकतो.

02) 'कृषी क्षेत्रात विकास घडवून आणण्यासाठी करावयाच्या कार्याची रूपरेखा म्हणजे कृषी विकास योजना होय.'

03) 'कृषी क्षेत्रातील विकास कामांचा आराखडा म्हणजेच कृषी विकास योजना होय.'

वरिल व्याख्यांन वरून योजना आणि कृषी विकास योजना यांच्यातील साम्य आणि फरक सहज लक्षात येतो. कुठल्याही कार्याला पुर्ण करण्यासाठी त्या कार्याची बनवण्यात आलेली रूपरेखा म्हणजेच योजना होय. आगदी त्याच प्रमाणे कृषी क्षेत्राचा विकास करण्यासाठी तयार करण्यात आलेली रूपरेखा, आराखडा म्हणजेच कृषी विकास योजना होय. या आंतर्गत शेती क्षेत्र विकासासाठी सरकार मार्फत आराखडा बणवण्यात येतो. आणि त्यानुसार अमलबजावणी केली जाते.

संशोधन विषयाची आवश्यकता (Need for a Research Topic):-

महाराष्ट्र राज्याच्या मध्याभागी आणि **'डेक्कन टॅप'** या नावाने ओळखल्या जाणा-या बेसॉल्ट खडकाच्या डोंगराच्या कुशीत वसलेला हिंगोली जिल्हा भौगोलीक दृष्ट्या महत्वाचा आहे. जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार 19˚ 15' उत्तर ते 20˚ 00' उत्तर अक्षवृत्ताच्या दरम्यान आणि रेखावृत्तीय विस्तार 76˚ 39' पूर्व ते 77˚ 30' पूर्व या रेखावृत्ता दरम्यान आहे. हिंगोली जिल्हा हा परभणी जिल्ह्याचे विभाजन करून दि. 01 मे 1999 रोजी तयार करण्यात आला. 2011 च्या जनगणने नुसार जिल्ह्याची एकून लोकसंख्या 11.78 लाख इतकी असून यातील 10.00 लाख एवढी लोकसंख्या ग्रामिण तर 1.78 लाख एवढी लोकसंख्या नागरी आहे. नद्या आणि मानवी वस्ती यांचा आत्यंत जवळचा संबंध आहे. आगदी त्याच प्रमाणे हिंगोली जिल्ह्याच्या प्राकृतीक रचनेत पैनगंगा,

पुर्णा, कयाधू या नद्यांचा समावेश होतो. जिल्ह्याच्या काही भागात शेतीस उपयुक्त असणारी काळी व मध्यम काळी जमीन आढळून येते. तर उर्वरीत भागात पांढरी व खडकाळ जमीन आहे. जिल्ह्याचे एकून क्षेत्र 4,69,241 हेक्टर असून 2018-19 वर्षा मध्ये निव्वळ लागवडी खालील क्षेत्र 4,09,694 हेक्टर येवढे होते. म्हणजेच एकूण क्षेत्रफळाच्या 87.30 टक्के जमीन ही लागवडी खाली असून उर्वरीत 12.7 टक्के जमीन इतर कारणांसाठी वापरली जाते. जिल्ह्यात लागवडी योग्य जमीनीवर उडीद, मूग, हळद, सोयाबीन, ऊस, तांदूळ, कापूस, केळी इत्यादी पिके घेतली जातात. जिल्ह्यातील एकून कामगारांच्या 82.2 टक्के कामगार एकट्या शेती व सलग्नीत क्षेत्रात कार्यरत आहेत. एकंदर जिल्ह्याचा भौगोलीक व आर्थिक अभ्यास करता लक्षात येते की, जिल्ह्यात कृषी हे महत्वाचे क्षेत्र आहे. जिल्ह्यात शेतीसाठी उपयुक्त जमीन, विविध नद्यांच आणि दोन मोठ्या प्रकल्पाच पाणी, उपयुक्त हवामान असून सुद्धा कृषी क्षेत्राचा विकास झाला नाही. हिंगोली जिल्ह्याच्या निर्मिती नंतर महाराष्ट्रात मागास जिल्हा आशी या जिल्ह्याची ओळख झाली. त्यामुळे सर्वच बाबतीत जिल्ह्याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. सततचा दुष्काळ, पिकांच्या अस्थिर किंमती, आधुनिक शेती तंत्राचा आभाव, अपुरी व अकार्यक्षम विपणन व्यवस्था, कमकुवत वाहतुक व साठवणूक व्यवस्था या व अशा अनेक प्रश्नांनमुळे जिल्ह्यातील शेतकरी मेटाकुटीस आला आहे. या अशा अनेक कृषी विषयक प्रश्नांचा निपटारा करण्यासाठी, जिल्ह्यातील शेतक-यांचा आणि शेती क्षेत्राचा विकास घडवून आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून विविध कृषी विकास योजना राबवल्या जातात. परंतु या योजनांचा उल्लेखनीय असा परीणाम हिंगोली जिल्ह्यात होताना दिसून येत नाही. योजनांच्या कार्यक्षम अमलबजावणीसाठी काय उपाय सूचवता येतील, जिल्ह्यातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असणा-या घटकांचा उलगडा करण्यासाठी सदरील संशोधन विषयाची आवशकता आहे.

<u>संशोधन</u> <u>विषयाची</u> <u>निवड</u> (Selection of Research Topic) :-

भारताच्या दक्षिण भागात स्थित असणाऱ्या महाराष्ट्रात राज्यात एकून 36 जिल्हे असून सहा महसूल विभाग (मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती) आहेत. भौगोलिक दुष्ट्या महाराष्ट्रात पाच विभाग आहेत. या पाच विभागात मराठवाडा हा विभाग असून त्यात औरंगाबाद, उस्मानाबाद, जालना, नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली आणि बीड या जिल्ह्यांचा समावेश होतो. या आठ जिल्ह्यामध्ये हिंगोली हा सर्वात मागास जिल्हा असून त्याची निर्मिती 01 मे 1999 रोजी झाली. पूर्वी हा जिल्हा परभणी जिल्हाचा एक भाग होता. 2011 च्या 15 व्या जनगनने नुसार जिल्ह्याची एकून लोकसंख्या 11.78 लाख होती. जिल्ह्यातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र 4,69,241 हेक्टर असून त्यापैकी 2018-19 वर्षा मध्ये निव्वळ पिकाखालील क्षेत्र 4,09,694 हेक्टर होते. जिल्ह्यात उडीद, मूग, सोयाबीन, तांदूळ, कापूस इ. महत्त्वाची खरीप पिके असून हरभरा, करडई ही महत्त्वाची रब्बी पिके आहेत. केळी व हळद ही महत्त्वाची व्यापारी पिके जिल्ह्यात पिकवली जातात. जिल्ह्यात सतत दुष्काळ, नापिकी, प्रदेशाचा मागासलेपणा, शेती पिकांचे अस्थीर भाव, प्रशासनाचे दुर्लक्ष, अपुरे व मागासलेले शेती तंत्रज्ञान या अशा एक न अनेक समस्यान मुळे जिल्ह्यातील शेती क्षेत्र अल्पविकसीत आहे. या कारणा मुळे जिल्ह्यात शेती विकासास खुप मोठी संधी आहे त्यासाठी शासना अंतर्गत विविध कृषी विकास योजना राबवल्या जातात. या कृषी विकास योजनांचा जिल्हातील शेक-यांना फायदा होतो का,

जिल्ह्यातील कृषी विकासात या योजनांचे कितपत योगदान आहे, हे पाहण्यासाठी "**कृषी क्षेत्राच्या विकासात शासकिय कृषी विकास योजनांचे योगदान विशेष संदर्भ : हिंगोली जिल्हा (2009-10 ते 2019-20)**" या अध्ययन विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाचा कालावधी (Time Period of Research) :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी आणि अध्ययनाअंती परिणाम प्राप्त करण्यासाठी लागणा-या माहितीचा सन 2009-10 ते 2019-20 असा सलग एकून दहा वर्षाचा कालावधी अध्ययन कालावधी म्हणून निवडला आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्टे (Objectives of Research) :-

1) शासनाद्वारे कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विभिन्न योजनांचा आढावा घेणे.
2) कृषी क्षेत्राच्या विकासासाठी अवश्यक असलेल्या घटकांचे अध्ययन करणे.
3) हिंगोली जिल्ह्यातील शेतक-यांचा कृषी विकास योजनेतील सहभाग स्पष्ट करणे.
4) कृषी क्षेत्राच्या विकासातील शासकीय कृषी विकास योजनांचे योगदान स्पष्ट करणे.
5) शासकिय कृषी विकास योजनांच्या लाभार्थी शेतक-यांचे आर्थिक विश्लेषण करणे.
6) शासकिय कृषी विकास योजनांच्या अमलबजावणित योण-या समस्यांचे अध्ययन करणे.
7) प्रस्तुत विषयाच्या संदर्भात यथार्थ निष्कर्ष काढून शिफारसी सुचविणे.

संशोधन विषयाची गृहितकृत्य (Hypothesis of Research) :-

1) हिंगोली जिल्ह्यात शासनाद्वारे राबविण्यात येणा-या कृषी विकास योजना आणि कृषी क्षेत्राचा विकास यांच्यात लक्षणिय संबंध दिसून येतो.
2) शासनाद्वारे हिंगोली जिल्ह्यात कृषी क्षेत्रासाठी राबविण्यात आलेल्या योजनांचा कृषी क्षेत्राच्या विकासावर अनुकूल परिणाम झाला आहे.
3) कालावधिनिहाय शासकिय कृषी विकास योजनांची संख्या, लाभार्थ्यांची संख्या आणि निधी यांच्यात वाढ होत आहे.
4) शासकिय कृषी विकास योजना आणि लाभार्थी शेतक-यांची अर्थिक स्थिती यांच्यात लक्षणिय संबंध दिसून येतो.
5) शासकिय कृषी विकास योजनांच्या अमलबजावनिवर प्रशासकिय, तांत्रीक आणि अप्रशासकिय बाबींचा विपरीत परिणाम होत आहे.

संशोधन पद्धती (Research Methodology):-

"कृषी क्षेत्राच्या विकासात शासकिय कृषी विकास योजनांचे योगदान विशेष संदर्भ: हिंगोली जिल्हा" (२००९-१० ते २०१९-२०) या संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी वर्णनात्मक किंवा विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात ऐणार आहे, तर तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम तथ्य संकलन पद्धत अश्या दोन्ही पद्धतींचा उपयोग करण्यात येत आहे. या संदर्भात सविस्तर विश्लेषण पुढीलप्रमाणे.

१) प्राथमिक समग्री (Primary Data)

संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी अचूक व प्रमाणित तथ्यांची उपलब्धता आवश्यक असते त्यासाठी प्राथमिक स्त्रोता पासून मिळवलेली माहिती महत्वाची ठरते. म्हणुन प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी या पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा व तालुका स्तरावरील कृषी कार्यालयातील पदाधीकारी याच्या मुलाखती तसेच विविध कृषी विकास योजनांच्या लाभार्थी शेतक-यांन कडून प्रश्नावली स्वरुपात प्राथमिक माहिती संकलित करण्यात येणार आहे.

२) व्दितीयक सामग्री (Secondary Data)

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी अध्ययन विषयाशी संबंधित सन 2009-10 ते 2019-20 या कालावधीमधील कृषी आणि शेतकरी कल्याण विभाग भारत सरकार यांचे वार्षिक अहवाल, कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांचे वार्षिक अहवाल, जिल्हा परिषद हिंगोली यांचे वार्षिक अहवाल, हिंगोली जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, विषया संदर्भात नेमलेल्या विविध समित्यांचे अहवाल, कृषी व सलग्नीत क्षेत्रांशी संबंधी रिसर्च जरनल, विविध दैनिके, शासकिय तसेच निमशासकिय आणि खाजगी संकेतस्थळे इत्यादींमधील माहितीचा उपयोग दुय्यम सामग्री म्हणून करण्यात येणार आहे.

तथ्याचे विश्लेषण (Analysis of Data):-

प्रस्तुत संशोधनातील विषयाच्या आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी संशोधनातील उपलब्ध आकडेवारीनुसार गणितिय व सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल. उदा. पिकांची उत्पादन वाढ पाहण्यासाठी साधा व सरासरी वार्षिक वृधी दर, मध्यमान, मध्यगा, प्रमाप विचलन, टी-टेस्ट, एफ टेस्ट, ANOVA, समाश्रयण विश्लेषण इत्यादी सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी सारणी, तक्ता आलेखाचा उपयोग करण्यात येईल.

<u>प्रकरणांची</u> <u>मांडणी</u> (Chapter`s Scheme) **:-**

"कृषी क्षेत्राच्या विकासात शासकिय कृषी विकास योजनांचे योगदान विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा (2009-10 ते 2019-20)" या विषयाच्या अध्ययनासाठी करण्यात येणा-या प्रबंधाची पाच प्रकरणामध्ये विभागणी करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले :- प्रस्तावना व संशोधन पद्धती

कृषी क्षेत्राच्या विकासात शासकिय कृषी विकास योजनांचे योगदान विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा या विषयाच्या अध्ययनासाठी एकूण सहा प्रकरणांची रचना करण्यात आली असून त्यातील पहिल्या प्रकरणामध्ये निवडलेल्या संशोधन विषयाची प्रस्तावणा, अध्ययन विषयाची निवड, संशोधन विषयाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितकृत्य, संशोधन पद्धती, तथ्यसंकलनाच्या पद्धती, नमुना निवड, संशोधन कालावधी, संशोधनाच्या मर्यादा आणि आकडेवारीचे विश्लेषण त्याचबरोबर शासकिय कृषी विकास योजनांचा अर्थ आणि व्याख्या, आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे योगदान, महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राची स्थिती आणि हिंगोली जिल्ह्यातील कृषी क्षेत्राची स्थिती यांचे अध्ययन विश्लेषण करण्यात आहे.

प्रकरण दुसरे :- संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात अध्ययन विषयाशी निगडीत आंतराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक पातळीवरील संशोधकांच्या कार्याचा, विविध लेखकांनी लिहिलेल्या लेखाचा किंवा पुस्तकांचा विषय अध्ययनासाठी अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे :- हिंगोली जिल्ह्याची भौगोलिक व आर्थिक वैशिष्टे

प्रस्तुत विषयाचे अध्ययन करताना तिसरे प्रकरण हिंगोली जिल्ह्याची भौगोलिक व आर्थिक वैशिष्टे घेण्यात आले आहे. या प्रकरणामध्ये हिंगोली जिल्ह्याची भौगोलिक व आर्थिक वैशिष्टे अभ्यासली जाणार आहेत. यात जिल्ह्याचा एकूण आढावा जसे कि हिंगोली जिल्ह्याची निर्मिती, जिल्ह्याचे भौगोलिक स्थान व विस्तार, लोकसंख्या, नद्या, जमिन इत्यादी त्याचबरोबर जिल्ह्यातील व्यवसायीक स्थिती यांचा सखोल आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे :- शासकिय कृषी विकास योजना व शेतकरी

चौथ्या किंवा प्रस्तुत प्रकरणामध्ये हिंगोली जिल्ह्यातील 2009-10 ते 2019-20 या वर्षातील शासनाद्वारे राबवण्यात आलेल्या कृषी विकास योजना आणि त्या योजनांनमधील शेतक-यांचा सहभाग अभ्यासला जाणार आहे. त्याचबरोबर शेतक-यांच्या सहभागातील आडचणी आणि कृषी विकास योजनांच्या अमलबजावणीत येणा-या आडचणींचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण पाचवे :- हिंगोली जिल्ह्यातील कृषी क्षेत्राच्या विकासात शासकीय कृषी विकास योजनांचे योगदान

विषयाच्या अध्ययनातील पाचवे आणि प्रमुख प्रकरण हिंगोली जिल्ह्यातील कृषी क्षेत्राच्या विकासात शासकीय कृषी विकास योजनांचे योगदान हे असून यात निवडलेल्या (2009-10 ते 2019-20) कालावधीमधील शासनाकडून राबवलेल्या कृषी विकास योजनांचा शेती क्षेत्रावर आणि शेतकरी वर्गावर कसा व किती परिणाम झाला आहे याचे अध्ययन करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रस्तुत प्रकरणामध्ये संकलित केलेल्या तथ्यांनवर प्रक्रिया केली जाणार आहे आणि त्याचे विश्लेषण केले जाणार आहे.

प्रकरण सहावे :- निष्कर्ष, ग्रहितकृत्याची पडताळणी आणि शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाअंती प्राप्त झालेले निष्कर्ष आणि त्या अनुषंगाने महत्वाच्या शिफारशी केल्या जाणार आहेत.

संदर्भ ग्रंथ सूची (Bibliography):-

संदर्भ सूची (References):

01) डॉ. ढमढेरे एस. व्ही. आणि डॉ. कुलकर्णी बी.डी., अर्थकशास्त्रीय संशोधन पद्धती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

02) डॉ. वावरे आणि कुंभार वि. (2015), अर्थशास्त्रातील संशोधन पद्धती, एज्युकेशनल पब्लिकेशन, औरंगाबाद

03) डॉ. पाटणकर ज., संशोधनाची क्षेत्रे आणि पद्धती, शब्दालया पब्लीकेशन हाऊस, अहमदनगर

04) प्रा. डॉ. मायी सु.(2008) , सामाजिक संशोधन पद्धती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

05) डॉ.खिराडे स. आणि श्रीमती पाटील ज.(2021), संशोधन पद्धती व संशोधन प्रकाशनाची नीतितत्वे, प्रशांत पब्लीकेशन. जळगाव

06) डॉ. बोधनकर सु. व प्रा. आलोणी वि. (2006) सामाजीक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन, नागपुर

07) डॉ. आगलावे प्र. (2010), संशोधन पद्धती व तंत्रे, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपुर

08) Dasgupta M. (2007), Research Methodology in Economics, BEEP & BEEP Publications, New Delhi

09) कविमंडन वि. (2012) , कृषी व ग्रामीण अर्थशासत्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर

10) कायंदे जी. व्ही. (2000), कृषी अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक

11) डॉ. मिश्र ज.प. (2020), कृषी अर्थशास्त्र, साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा

12) डॉ. पाटील ए. एन. , कृषी अर्थशास्त्र, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव

13) डॉ. भिसे रा., कृषी विकासाचे अर्थशास्त्र (आव्हाने व उपाय), प्रशांत पब्लिकेशन्स,

14) देऊळगावकर अ. (2019), स्वामीनाथन भूकमुक्तीचा ध्यास, साधना प्रकाशन
15) प्रा. रायखेलकर व डॉ. दामजी (2013), भारतीय अर्थव्यवस्था, विघा बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
16) प्रा. मगर ज्ञा. (2021), सरकारी योजना, रत्नाई पब्लिकेशन, सोलापूर
17) सिंह र. (2016), भारतीय अर्थव्यवस्था, मॉक ग्रो हिल एज्युकेशन (इंडिया) प्रायव्हेट लिमीटेड, दिल्ली
18) अग्रवाल स.(2012), ग्रामीण भारत एवं भारतीय अर्थव्यवस्था, इशिका पब्लिकेशन्स हाऊस, जयपुर
19) Mittal A.C. and Sharma S.P.(2001) Agricultural Economics, RBSA Publishers, Jaipur
20) Dr. Devendra Singh, Agricultural Development in India, Anmol Publications, New Delhi

मासिके, वार्षिके आणि नियतकालिके (Magazines and Annuities):

1. आर्थिक समीक्षा, वित्त मंत्रालय, भारत सरकार (2020-21)
2. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा – हिंगोली (विविध अंक)
3. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई (2020-21)
4. योजना, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार (विविध अंक)
5. कृषी दैनंदिनी, मराठवाडा कृषी विघापीठ, परभणी

संकेत स्थळ (Web Sides) **:**

1. **www.wikipedia.org/wiki/e-commerce**
2. **www.hingoli.nic.in**
3. **www.mahades.maharashtr.gov.in**
4. **www.maharashtra.gov.in**
5. **www.agricoop.nic.in**
6. **www.vishwakosh.marathi.gov.in**

संशोधक

व्ही. बी. कदम

एम.ए., बी.एड., सेट.(अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. डी. डी. भोसले

सहाय्यक प्राध्यापक ,
यशवंत महाविद्यालय, नांदेड